कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१-२०२२/१६५५
दि. २०/१०/ २०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित मराठी 'ब' गट नाट्य स्पर्धा जानेवारी महिन्यात रविंद्र भवन, साखळी येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत २९ ऑक्टोबर २०२१ असून स्पर्धेची नियमावली व निर्धारीत नमून्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभाग, आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पाटो, पणजी-गोवा येथे विनामूल्य उपलब्ध असणार आहेत.

प्रवेशिका सादर करतेवेळी संस्थेचे नाव, रजिस्ट्रेशन क्रमांक, नोंदणी करण्याचा दिवस, संस्था नोंदणी कायद्याच्या सुधारित नियमानुसार सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या संस्थांचे नोंदणीकरण करणे बंधनकारक असल्याकारणाने सदरचा तपशील , नाटकाचे नाव, एवढीच माहिती पुरविणे आवश्यक आहे.स्पर्धक संस्थेला आपल्या प्रवेशिकेसोबत रू. ५००/-(रूपये पाचशे मात्र) प्रवेशशुल्क तसेच रू. ५०००/- (रूपये पाच हजार मात्र) रोख अनामत रक्कम कला अकादमीकडे भरणा करावी लागेल. कलाकारांच्या नामावलीच्या चार प्रती व संहितेची एक प्रत स्पर्धक संस्थेला प्रयोगाच्या दिवशी कला अकादमीकडे द्यावी लागेल. सदर स्पर्धेचा अनुक्रम सहभागी संस्थांच्या प्रतिनिधीसमक्ष दि. २९ ऑक्टोबर २०२१ रोजी सायं. ४.३० वाजता ठरविण्यात येणार आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

**महितीसाठी प्रतः-**

लेखाधिकारी, कला अकादमी गोवाः-कृपया संस्थाचे प्रवेशशुल्क व अनामत रक्कम रोख स्वरुपात स्वीकारण्याची व्यवस्था करावी.